# जागतिकरण व भारतीय पर्यावरण

**प्रा. तुळशीदास मोकल**
इतिहास विभाग प्रमुख
को.ए.सो. डॉ. सी.डी. देशमुख
वाणिज्य व सौ.के.जी ताम्हणे
कला महाविद्यालय, रोहा रायगड

**प्रस्तावना** :

'खाउजा' ही विसाव्या शतकाच्या शेवटच्या कालखंडातील व एकविसाव्या शतकातील एक अतिशय महत्वाची संकल्पना 'खा' म्हणजे खाजगीकरण 'उ' म्हणजे उदारीकरण व 'जा' म्हणजे जागतिकीकरण तिन्ही घटकांना जगाच्या आर्थिक उत्क्रांतीचे परमावधी असे मानले जाते या तिन्ही घटकांचा भारतीय अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी वापर करण्यात आल्याने भारतातील सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण झाले. यामुळेच भारताच्या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाची मालकी, त्याचे व्यवस्थापन व नियंत्रण खाजगी क्षेत्रातील उद्योगांना हस्तांतरित करण्यात आले व पुढे उदारीकरणाच्या धोरणाला अनुसरून अर्थव्यवस्थेवर लादण्यात आलेले निर्बंध व नियंत्रण काढून टाकण्यात आले पुढे जागतिकीकरण हे नवीन आर्थिक धोरणाचे एक महत्वाचे सूत्र आले व त्यांनी वस्तू, सेवा, तंत्रज्ञान व भांडवलावरील सर्व प्रकारचे निर्बंध दूर करून जागतिकीकरणाचा मार्ग सुखकर व गतिमान केला. याच जागतिकीकरणाला दुसऱ्या शब्दात 'वैश्विकरण' असेही म्हटले जाते. या जागतिकीकरणामुळे भारताची स्थानिक अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली व भारत जागतिकीकरणाच्या प्रवाहात समाविष्ट झाला.

प्रस्तुत शोध निबंधात जागतिकीकरणाचे भारतातील पर्यावरणातील कोणत्या घटकांवर परिणाम झाले आहेत तसेच या परिणामाला सामोरे जाण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजनांची अंमलबजावणी काय करायला पाहिजे याची माहिती चिकित्सक पद्धतीने मांडण्यात आलेली आहे.

1) **भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन** :- जागतिकीकरण प्रक्रियेमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतात प्रवेश करण्याची संधी मिळाली. परिणामी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात मोठ्या प्रमाणात शिरकाव केला. सन २००३ मध्ये भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्यांची संख्या १९४७ झाली. हीच संख्या २००४ पर्यंत १६५४ वर पोहचली. आता टप्प्याटप्प्याने या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या संख्येत वाढ होत आहे. या कंपन्या आंतरराष्ट्रीय कंपन्या, जागतिक कंपन्या, सीमापार कंपन्या या नावाने वावरत आहेत. जगात या प्रकारच्या तीनशे कंपन्या आहेत. व जगातील 25% संपती या कंपन्यांच्या मालकीचे आहे. जागतिकीकरणामुळे भारताने बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या अर्थव्यवस्थेतील महत्वाच्या क्षेत्रांचा ताबा दिला आहे. नैसर्गिक संपत्तीच्या त्रुटीचा तसेच पर्यावरण प्रदूषित करण्याचा हक्कही दिला आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे अलीकडेच भारत सरकारने, 'गॅस अँथोरिटी ऑफ इंडिया लिमिटेड' किंवा 'गेल' च्या 18% समभागाची विक्री केली आहे. यातील ५ समभाग एन्रॉन कार्पोरेशन व १.३% समभाग ब्रिटीश कंपणीने विकत घेतले. भारतातील 95% हिस्स्यावर या कंपनीचे वर्चस्व आहे. याशिवाय 'तेल' व 'नैसर्गिक वायू' महामंडळाने शोधून विकसित केलेले तेलक्षेत्र देखील खाजगी उद्योग समूहाच्या ताब्यात दिले जात आहे. या बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारतातील पर्यावरणातील कोणत्या घटकांवर परिणाम होतो हे जाणून घेणे आवश्यक आहे.

२) **जागतिकीकरणाचा भारतीय पर्यावरणावरील परिणाम**:- जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारतात आल्याने पर्यावरण प्रदूषणाचे स्वरूप गंभीर झाले. व हे प्रदूषणाचे गंभीर स्वरूप संकट रूपाने आज समस्त भारतीयांना पुढे उभे आहे. त्यामुळे 'आम्लपर्जन्य, कार्बन डाय-ऑक्साइड, वायूमध्ये वाढ, हरितगृह परिणाम, तापमान वाढ' यासारख्या पर्यावरणीय आपत्तींना आज आपल्याला तोंड द्यावे लागत